महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित,

महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगाव.

## मराठी विभाग

## कोविड-१९ कार्यक्रम अहवाल - २०२०-२१

शैक्षणिक वर्ष २०२०-२१मध्ये सर्वत्र कोविड १९ ने महाराष्ट्रात थैमान घातले होते. अशा परिस्थितीत सर्वत्र तालेबंदी करण्यात आली. अशा स्थितीत महाविद्यालयातील मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी व प्राद्यापाकानी अगदी भरीव काम केले. टाचा अहवाल पुढील प्रमाणे.

**१. समाधान सुरेश शिंपी - T.Y.B.A. Matrathi**

A. सदर विद्यार्थ्याने कोरोना कालावधीत दवाखान्यात जेवणाचे डबे पोहचवलेत.
B. अनाथ लोकांना जेवण दिले.
C. प्रयास या मालेगावातील नामांकित खाजगी दवाख्ण्यातील रुग्णांना मालेगाव महानगर पालिका अंतर्गत रिमांडहोम अनाथ आश्रम मोसमपूल येथील अनाथ वृद्ध महिलांना चे डबे पोहोच केले.
D. बँक सेक्युरिटीस जेवणाचे डबे पोहोच केले.

**२. चेतन खांडेकर - T.Y.B.A. Matrathi**

A. सदर विद्यार्थ्याने कोरोना कालावधीत मालेगाव महानगर पालिका अंतर्गत रिमांडहोम अनाथ आश्रम मोसमपूल येथील अनाथ वृद्ध महिलांना मनोरंजनातून कोरोन या आजाराचे महत्व व परिणाम समजून सांगत होतो.
B. मुस्लीम वयोवृद्ध बाबास मोबाईल चा वापर व आधार कार्ड बँकस लिंक करणे बाबत माहिती दिली.
C. कोरोना कालावधीत रुग्णांची तपासणी कण्यासाठी मदत करून कॉम्प लावलेत.
D. मालेगाव महानगर पालिका अंतर्गत रिमांडहोम अनाथ आश्रम मोसमपूल येथील अनाथ वृद्ध महिलांना जेवण देवून खाऊ घालण्याचे अतिशय मौल्यवान काम या विद्यार्थ्याने केले.

प्रमुख
मराठी विभाग
म.स.गा. महाविद्यालय
मालेगांव कॅम्प (नाशिक)

20-21

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित,

# म.स.गा. कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

मालेगाव-कॅम्प जि.नाशिक

## मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा :२०२१

दिनांक.२८/०१/२०२१

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगांव येथे दिनांक:१४ जानेवारी २०२१ ते दिनांक २८ जानेवारी २०२१ या कालावधीत मराठी विभागातर्फे 'मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा' निमित्त विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यात निबंध लेखन, काव्यलेखन व सुंदर हस्ताक्षर स्पर्धा यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

दिनांक २८ जानेवारी २०२१ रोजी प्रा.डॉ. विलास देवरे एस.एस.आर.पी.व्ही.नाईक कॉलेज नाशिक यांचे 'मराठी भाषा संवर्धन काळाची गळज' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सी.एम. निकम हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी भाषेचे महत्व तसेच महाविद्यालयातील मराठी विभाग नेहमीच कसा कार्यरत असतो, याबाबत आढावा घेतला. सदर ऑनलाईन व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.अरुण पाटील यांनी केले तर सुत्रसंचालन पाहुण्यांचा परिचय व आभार प्रदर्शन प्रा. डॉ.अर्जून नेरकर यांनी केले.

सदर कार्यक्रमाप्रसंगी प्रा.डॉ. विलास देवरे यांनी मराठी भाषा संवर्धन काळाची गरज या विषयावर अभ्यासपूर्ण असे व्याख्यान दिले. आपले मनोगत व्यक्त करतांना त्यांनी मराठी भाषेचा उगम व विकास आणि मराठी भाषेची सद्यस्थिती विशद केले. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध साधनांचा मराठीवर कसा घातक परिणाम होतो हे ही त्यांनी उदाहरणासह स्पष्ट केले. यावर त्यांनी काही उपायही सूचविले. सदर कार्यक्रमाप्रसंगी बहुसंख्य शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते. सर्वांनी व्याख्यानाचा लाभ घेतला व मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त आयोजित विविध उपक्रमातही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सहभाग नोंदवला.

कार्यक्रम यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश शिरुडे, उपप्राचार्य डॉ.सी.एम.निकम,महाविद्यालयाचे कुलसचिव श्री.रघुनाथ शेलार, कला विभाग प्रमुख डॉ.एन.बी.बच्छाव, मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.ए.यु.पाटील, प्रा. डॉ. अर्जून नेरकर, प्रा.डॉ. पी.के.शेवाळे, डॉ. विनोद गोरवाडकर, डॉ. सपना सोनवणे व सर्व मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

D'Swle
प्राचार्य
म. स. गा. कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, मालेगांव कॅम्प (नाशिक)